**प्रेस नोट** **दिनांक १३/७/२०१९**

**उत्तमनगर पोलीस ठाणे**

**पत्ता विसरलेल्या ज्येष्ठ महिलेस आधार देवुन तीस भावाचे ताब्यात दिले.**

एनडीए पोलीस चौकी येथे दिनांक १०/७/२०१९ रोजी पो.हवा.विजय लोयरे, ब.नं.५४१० हे डयूटी अंमलदार म्हणून नोकरीस होते. चौकीस प्रभारी अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक श्री.डेंगळे व पोलीस उपनिरीक्षक श्री.शिंदे हे हजर असताना एक वृध्द स्त्रीस १७.०० वाजता काही नागरीकांनी हजर केले व त्या स्त्रीने आपले नाव श्रीमती रुक्मिणी कृष्णा मोरे वय ८५ वर्षे असे सांगितले. परंतू त्यांना त्या रहात असलेल्या ठिकाणचा पत्ता सांगता येत नाही असे सांगितले आहे.असे कळविले सदरहू स्त्री कडे चौकीचे अधिकारी व कर्मचारी यांनी माहिती घेता त्या घरुन स्टोव्ह रिपेअर करीता निघाल्या होत्या परंतू त्यांना त्यांचे घराचा पत्ता माहिती नाही. त्यामुळे त्या चुकल्या आहेत अशी माहिती समजून आली. तसेच सदरहू स्त्री या जनसेवा अनाथआश्रम भिलारेवाडी कात्रज येथे देखील दाखल होत्या असेही अधिक माहिती घेता समजून आले.त्यामुळे जनसेवा अनाथआश्रम भिलारेवाडी कात्रज येथील फोन नंबर प्राप्त करुन त्यांचेशी वरील अधिकारी व कर्मचारी यांनी प्रयत्न केला, परंतू रात्री उशीर झाल्याने संबंधित ठिकाणाहून कोणीही फोन रिसीव्ह केला नाही. त्यानंतरही पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी वरील स्त्री यांचेकडे त्या रहात असणारे ठिकाणचे आजू बाजूची माहीती विचारली परंतू ती त्यांन सांगता आली नाही. त्यानंतर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी सदरहू स्त्री यांचे जेवणाची सोय केली. व पोलीस ठाण्यास महीला कर्मचारी नोकरीस असल्याने त्यांना झोपण्यासाठी महीला कर्मचारी यांचे सोबत उत्तमनगर पोलीस ठाण्यास ठेवले. दुसरे दिवशी सकाळी पोलीसांनी जनसेवा अनाथआश्रम भिलारेवाडी कात्रज येथे पुन्हा संपर्क साधून चौकशी केली असता सदर स्त्री यांचा मानलेला भाऊ मेहबूब इमाम शेख हे वारजे माळवाडी येथे रहात असून त्यांचा मोबाईल क्रमांक दिला. तेव्हा त्यांचेशी संपर्क करुन त्यांना एनडीए पोलीस चौकी येथे बोलावून चौकशी करुन खात्री झालेनंतर श्रीमती रुक्मिणी कृष्णा मोरे यांना मेहबूब इमाम शेख वय ५५ रा.माई मंगेशकर हॉस्पिटल शेजारी विनोद शहा यांचे साईटवर वारजे माळवाडी पुणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.